N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** नर्सी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0127 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनाक आणि वेळ):**06/06/2026 02:33

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date From (दिनाक पासून):** 05/06/2026
**Date To ( दिनाक पर्यंत):** 05/06/2026
**Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनाक ):** 06/06/2026 **Time (वेळ):** 02:03 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनाक आणि वेळ):** 06/06/2026 02:03 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 08 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पुसेगाव फाटा,सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास, पुसेगाव फाटा,सेनगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** नर्सी

**District(State) (जिल्हा(राज्य)):** हिंगोली(महाराष्ट्र)

10 Total (कोई

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): RAJESH HANMANLU MALPILU

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 11/03/1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | RATMALI TQ DHARMABAD,NANDED,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र, भारत |
| 2 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक वि हिंगोली,हिंगोली,नर्सी,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 3 | स्थायी पता | RATMALI TQ DHARMABAD,NANDED,धर्माबाद,नांदेड,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8788056817

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रामेश्वर अर्जुन रोडगे | | | 1. ह मु रामाकष्णा पार्क,बळसोंड , हिंगोली ,नर्सी,हिंगोली,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

सरकार तर्फे फियाद
ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली.
दिंनाक 06/06/2026

मी, राजेश हनमनलु मलपिलु, वय42वर्ष पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, हिंगोली मो.नं. 8485070037.

सरकार तर्फे फियादी होऊन फियाद देतो की, मी वरील प्रमाणे असुन, जुन 2025 पासून पोलीस निरीक्षक म्हणुन लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, हिंगोली येथे नेमणूकीस आहे. मी दिंनाक 05/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालय हिंगोली येथे हजर असतांना तक्रारदार श्री दिनेश विष्णु चव्हाण, वय 25वर्ष, व्यवसाय शिक्षण, रा. खिल्लार ता. सेनगाव जि. हिंगोली यांनी कार्यालयात येवून तक्रार दिली की, माझे बि.ए. तृतीय वर्षाचे शिक्षण तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव ता. सेनगाव जि.हिंगोली येथे सूरू आहे. मी माझे परीवारासह खिल्लार गावी राहत असून,माझे परीवारात माझी पत्नी, वडील विष्णु चव्हाण, आई, आजी, भाउ व भावजय यांचेसह राहतो.माझे वडील शेती व्यवसाय करतात.

माझे आजोबा हरी मनची चव्हाण हे 2005 मध्ये मयत झाले आहेत. त्यांचे नावे खिल्लार गाव शेत सर्वे नं 113 व 15 मध्ये एकुण 07 एकर जमीन आहे. आजोबाचे मृत्यू नंतर वारस म्हणुन माझे वडील विष्णु हरी चव्हाण, माझी आजी देवकाबाई हरी चव्हाण, आत्या लक्ष्मीबाई, शोबाबाई व चुलते रामराव चव्हाण यांचे नावे 7/12 वर लागली आहेत. माझी आजी देवकाबाई हरी चव्हाण, आत्या लक्ष्मीबाई, शोभाबाई व चुलते रामराव हरी चव्हान यांनी बॉन्डवर हक्कसोड लिहुन दिल्यामुळे, एकुण जमीन पैकी माझे वडील विष्णु हरी चव्हाण यांचे नावे 05 एकर जमीन हक्कात दयायेचे ठरले होते व त्याबाबत माझे वडीलाचे नावे वडीलोपार्जीत शेती फेर व्यवहाराची कारवाई पुर्ण करून 7/12 वर नाव आणुन देतो असे आमचे गावाचे खिल्लार सजाचे ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी म्हणाल्यानी आम्ही त्यांना भेटण्यासाठी मी व माझे सोबत माझे वडील विष्णु चव्हाण,माझी आजी देवकाबाई हरी चव्हाण, आत्या लक्ष्मीबाई, शोबाबाई व चुलते रामराव असे दि.02/06/2026 रोजी सेनगाव येथे गेलो होतो. तेव्हा तहसील कार्यालय सेनगाव येथे ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांची व आमची भेट झाली. त्यावेळी चर्चा करून आम्ही, माझे वडील विष्णु हरी चव्हाण यांचे नावे 05 एकर जमीन जमीनीची 7/12 वर नोंद घेण्यासाठी बॉन्डवर हक्कसोड लिहुन घेतलेली नोटरी व कागदपत्रे ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांना दिले व त्यांचे मार्फतीने तहसिल कार्यालय सेनगाव येथे फाईल दाखल केली. तेव्हा माझे वडील विष्णु हरी चव्हाण यांचे नावे 05एकर जमीन फेर व्यवहाराची कारवाई पुर्ण करून 7/12 वर नाव आणुन देतो तर त्यासाठी 22000/- रू. दयावे लागतील म्हणुन ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी लाचेची मागणी केली व आम्हाला म्हणाले की, तुम्ही मला पैसे दिले नाही मी तुमचे काम होणार नाही असे सांगीतले होते.

ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांना लाच देण्याची माझी अजिबात ईच्छा नव्हती. परंतु ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे आम्हाला फेर व्यवहार पुर्ण करण्यासाठी व 7/12 वर नोंद घेण्यासाठी मागत असलेले रक्कम जर त्यांना दिले नाही तर, ते माझे वडील विष्णु हरी चव्हाण यांचे नावे 05 एकर जमीन 7/12 वर नोंद होवु देणार नाहीत, म्हणुन मी नाईलाजास्तव त्यांना लाच देण्यास होकार दिला आहे. त्याच दिवशी रामेश्वर रोडगे यांनी आता अर्धी रक्कम मला दया व उर्वरीत नंतर दया सांगीतले होते, त्यामुळे दि.02/06/2026 रोजी सेनगाव तहसील कार्यालयासमोर, मी त्यांना नगदी 8000/- रू दिले होते. त्यानंतरही ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी वडीलोपार्जीत शेती माझे वडीलाचे नावे फेर व्यवहार पुर्ण करून7/12 वर नाव नोंद अदयाप झाली नाही व उर्वरीत 14000/- रू. मला दिले तरच मी तुमचे वडीलाचे नावे फेरव्यवहार करून 7/12 वर नोंद घेईल नाहीतर घेणार नाही, असे म्हणुन आता 14000/- रू. लाचेची मागणी केली आहे. त्यांना लाच म्हणुन देण्यासाठी 14000/-रू.

मी माझे बचतीतुन सोबत आणले आहेत. ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे व माझ्यामध्ये कोणतीही अर्थिक देवाण - घेवाण नाही किंवा त्यांचेत व माझ्यामध्ये दुश्मणी नाही. त्यामुळे ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांनी किंवा त्यांचे मार्फतीने इतर कोणी माझे कामासाठी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचे विरूध्द कायदेशिर कार्यवाही होणेस विंनती आहे.सदर तकारी वरून कारवाईचे अनुषंगाने मा. सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, हिंगोली यांना दिलेल्या लेखी पत्रकान्वये त्यांनी त्यांचे कार्यालयाचे पंच 1) श्री राजु बाबुराव चरण, वय 39 वर्ष पद शिपाई, गट ड, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली ता.जि. हिंगोली. 2) श्री विनोद मोतीगम कागणे, वय 35 वर्ष पद कनिष्ट लिपीक, गट- क, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, हिंगोली ता.जि. हिंगोली असे ला.प्र.वि. हिंगोली कार्यालयात हजर आले.

दि.05/06/2026 रोजी लाप्रवि कार्यालय हिंगोली येथे तकारदार व वर नमुद दोन्ही पंच हजर असताना यातील तक्रारदार यांनी त्यांची तकार पंचासमक्ष तोंडी कथन केली. त्यानंतर सदरची तकार तक्रारदार यांनी तोंडी सांगितली त्यावरून संगणकावर टंकलिखीत केली असुन तकारदार यांनी दिलेली तकार पंचानी वाचुन पाहिली. तक्रारदार यांची तोंडी कथन केलेली तकार व संगणकावर टंकलिखीत केलेली तक्रार एकच असल्याचे खात्री झाल्याने त्यावर दोन्ही पंचानी सहया केल्या.

त्यानंतर शासकीय पंचा समक्ष तकारदार दिनेश चव्हाण यांनी सांगितले की, मी आज ग्राम महसुल अधिकारी रामेश्वर रोडगे यांना मोबाईलव्दारे संपर्क केला असता त्यांनी सांगीतले की, मी सेनगाव तहसील कार्यालय येथे आहे. मी सेनगाव तहसील कार्यालय येथे जावून त्यांची भेट घेणार आहे व माझे कामासंबंधाने बोलणी करणार आहे त्यामुळे पुढील कार्यवाही करावी असे सांगीतले होते त्यावरून लाचमागणी पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने पडताळणी पथक व सापळा पथकातील सदस्य, पंच व तक्रारदार यांना थोडक्यात सुचना देवुन लाचमागणी पडताळणी कारवाई सेनगाव येथे जावुन करण्याचे ठरविले.

त्यानंतर आम्ही पडताळणी व सापळा पथकासह शासकीय वाहान कंमाक एमएच 38 एडी 4337 ए.सी. बी. कार्यालय, हिंगोली येथुन निघुन सेनगाव ते जिंतुर जाणारे रोडवरील, मकोडी फाटीचे बाजुस असलेल्या गणपती मंदीर येथे अंदाजे 15.30 वा. पोहचलो. आमच्या सुचनेवरून पोशि/जाधव यांनी तक्रारदार व दोन्ही पंचाना व्हॉईस रेकॉर्डर बाबत व त्यामध्ये वापरण्यात येणाऱ्या मेमरीकार्ड बाबत माहिती दिली. माझे सुचनेवरून पोशि/जाधव यांनी व्हॉईस रेकॉर्डर अंदाजे 16.00 वा. सुरू करून तक्रारदार श्री चव्हाण यांचे अंगातील शर्टच्या आतील बाजुस कापडी पिशवीत टाकुन आडकावुन दिला. त्यानंतर तक्रारदार हे पंच क्रं.1 श्री चरण यांचे सोबत लोकसेवक रामेश्वर रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांची तहसील कार्यालय, सेनगाव येथे भेट घेण्यासाठी तक्रारदार यांच्याकडील मोटर सायकलने रवाना झाले.

त्यानंतर अंदाजे 16.37 वा. तक्रारदार श्री चव्हाण व पंच क.1 श्री चरण असे मोटर सायकलने पडताळणी पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी पोशि/जाधव यांनी तक्रारदार श्री चव्हाण यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला. त्यानंतर तक्रारदार श्री चव्हाण व पंच क.1 चरण यांना पडताळणी कारवाई दरम्यान घडलेल्या घटनाक्रमायावत विचारपुस केली. त्यावेळी पंच क. 1 श्री चरण यांनी सांगितले की, तकारदार व लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांची सेनगाव तहसील कार्यालयाच्या आवारात भेट झाली. त्यावेळी लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी व तक्रारदार यांची तक्रारदार यांचे कामाच्या अनुषंगाने चर्चा झाली. चर्चेदरम्याण लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांनी 22000/- रू. लाचेची मागणी करून, यापुर्वी 8000/- रू. लाच रक्कम स्विकारल्याचे मान्य केले व उर्वरीत रक्कम 14000/- रूपयाची लाचेची मागणी करुन लाच रक्कम आजच स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांची सेनगाव ते हिंगोली गंडवरील पुसेगाव फाटा भेट होणार असल्याचे सांगितल्याने लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांच्या विरुध्द पुसेगाव फाटा येथे सापळा कारवाई आजमावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी सापळा पुर्व कारवाईला सुरवात केली. पोह श्री गोविंद शिंदे यांनी तक्रारदार व दोन्ही पंचासमक्ष अँन्थ्रॉसिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट लॅम्पच्या गुणधर्मायावत माहिती देवुन प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुषंगाने तकारदार, पंच व सापळा पथकातील अंमलदाराना सुचना दिल्या. लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांनी तक्रारदार दिनेश चव्हाण यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारल्यानतर तकारदार यांनी लाच रक्कम स्विकारल्याबाबत इशारा म्हणून गळ्यातील मोठा पांढऱ्या रंगाचे रुमालाने तोंड पुसन उजवे हातात धरणे बाबत तक्रारदार यांना सुचनादिली. त्यानंतर पोह गोविंद शिंदे यांनी लाच रक्कमेला अँन्थ्रॉसिन पावडर लावुन तकारदार यांच्या अंगावरील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात अलगत ठेवुन दिली.

त्यानंतर तकारदार यांच्याकडे 18.06 वाजता व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन पंच क. 1 चरण यांच्यासोबत

लोकसेवक रोडगे, ग्राम महसुल अधिकारी यांची भेट घेण्यासाठी तकारदार चव्हाण यांना यांचे मोटार सायकलने पुरोगाव फाटा येथे रवाना केले. त्यांच्या पाठोपाठ काही अंतराने आम्ही व सापळा पथकातील पोह श्री. फुपाटे, पोशि/अमोल जाधव, व पंच कं.2 श्री. कागणे असे शासकिय वाहन क.एम.एच.38 एडी 4337 ने तसेच सापळा कारवाईस ला.प्र. वि. हिंगोली येथून मदतीला बोलावून घेतलेले पोह/वरणे, पोशि श्री. वाघ असे शासकीय मोटार सायकल पुसेगाव फाट्याकडे रवाना झालो. पुसेगाव फाटा येथे पोहचल्यावर तक्रारदार यांची पुसेगाव फाटा येथील सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास या दुकाणासमोर तक्रारदार व पंच कमांक 01 पोहचल्यानंतर सापळा पथकाने थोडया अंतरावर शासकिय वाहन बाजुला उभे करून, तिथे कोणासही संशय येणार नाही अशा प्रकारे सापळा लावला. त्यांनंतर तक्रारदार चव्हाण यांची पंच क. 01 चरण यांचे समक्ष सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास दुकाणा समोर भेट झाली, त्यानंतर लोकसेवक रोडगे, ग्राम महसूल अधिकारी व तक्रारदार हे त्यांचे कामासंबधाने बोलणी करत सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास दुकाणा पाठीमागे मोकळया जागेत चालत गेले.

थोडया वेळाने अंदाजे 18.29 वा.चे सुमारास तक्रारदार चव्हाण यांच्याकडुन लोकसेवक रोडगे, ग्राम महसूल अधिकारी यांनी पंचासमक्ष स्वतः 14000/- रु. लाच रक्कम स्वतः स्विकारली असता, तक्रारदार यांनी त्यांना सांगीतल्याप्रमाणे लाचं स्विकारल्या बाबत त्यांनी त्यांच्या गळयातील मोठा पांढऱ्या रंगाचे रुमालाने तोंड पुसून उजवे हातात धरून सापळा पथकास इशारा केला. त्यावेळी आम्ही, लोकसेवक रोडगे, ग्राम महसूल अधिकारी यांना सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास दुकाणाचे पाठीमागील मोकळ्या जागेत जावून ताब्यात घेतले. त्यावेळी सापळा पथकातील पोशि जाधव यांनी तकारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. त्यानंतर आम्ही आमचा, पंचाचा व सापळा पथकातील सदस्याचा परिचय देवुन लोकसेवक रामेश्वर रोडगे, ग्राम महसूल अधिकारी यांना त्यांचा नाव, गाव पत्ता विचारला असता त्यांनी रामेश्वर अर्जुन रोडगे, वय 43 वर्ष, व्यवसाय नौकरी पद- ग्राम महसूल अधिकारी, सजा खिल्लार, तहसील कार्यालय सेनगाव, ता. सेनगाव जि. हिंगोली असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर स्विकारलेल्या लाचेच्या रक्कमेबाबत विचारपुस केली असता त्यांनी स्विकारलेली अँन्थ्रॉसिन पावडर युक्त 14000/- रू (ज्यात 500/- रू. दराच्या 21 नोटा व 100/- रू. दराच्या 35 नोटा) लाच रक्कम त्यांचे हातात धरून ठेवली ती पंचा समक्ष हस्तगत करण्यात आली आहे. सदर बाबत सविस्तर पडताळणी, सापळा पुर्व व सापळा कारवाई पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी तक्रारदार श्री. दिनेश विष्णु चव्हाण, वय 25 वर्षे, व्यवसाय शिक्षण, रा. खिल्लार ता. सेनगाव जि. हिंगोली यांनी दिंनाक 05/06/2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, हिंगोली येथे दिलेल्या तक्रारीवरुन, करण्यात आलेला पडताळणी, सापळा पुर्व व सापळा पंचनामा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक रामेश्वर अर्जुन रोडगे, वय 43 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद ग्राम महसूल अधिकारी, सजा खिल्लार, तहसील कार्यालय सेनगाव, ता. सेनगाव जि. हिंगोली, रा. जाभरून रोडगे, ता. सेनगाव जि. हिंगोली, ह.मु. रामाकृष्णा पार्क, बळसोंड हिंगोली यांनी तक्रारदार दिनेश चव्हाण यांना त्यांचे वडीलाचे नावे शेती फेर व्यवहाराची कारवाई पुर्ण करून 7/12 वर नाव आणुन देतो म्हणुन 22000/- रु. लाचेची मागणी करून, त्यापैकी 8000/-रू. लाच रक्कम यापुर्वी स्विकारल्याचे मान्य केले व उर्वरीत 14000/- रू. लाचेची मागणी करून, आज दिनाक 05/06/2026 रोजी 18.29 वा.चे सुमारास सापळा कारवाई दरम्यान तकारदार चव्हाण यांच्याकडुन सेनगाव ते हिंगोली रोडवरील पुसेगाव फाटा येथील सुशांत अल्युमिनिय अँन्ड ग्लास दुकाणा पाठीमागील मोकळया जागेत 14000/- रू लाच रक्कम पंचा समक्ष स्वतः स्विकारली आहे.

आरोपी लोकसेवक, रामेश्वर अर्जुन रोडगे, वय 43 वर्ष, व्यवसाय नौकरी, पद ग्राम महसूल अधिकारी, सजा खिल्लार, तहसील कार्यालय सेनगाव, ता.सेनगाव जि.हिंगोली यांनी तकारदार दिनेश चव्हाण यांच्याकडुन स्वतः लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरुध्द कलम 7भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम 1988 प्रमाणे कायदेशिर फिंयाद आहे.

फिंयाद दिली सही

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
VIKAS MAROTI GANWAT
**Rank** (पद): Dy. SP (Deputy Superintendant **No.**(क्र.): DGPVMGM8101
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ashok balaji gharge
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API

HC-317
पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे.नर्सी (ना.)